# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/07/2023 (गुरूवार) दुपार


---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
### वाहनासह एकुण २०,२१,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त
### पोलीस स्टेशन कुहीची कारवाई

दिनांक ०५/०७/२०२३ रोजीचे ००.३० वा. ते ००.४५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन कुही हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, मौजा खापरी फाटा नागपूर उमरेड रोड वरून रेतीची चोरटी वाहतुक टिप्पर वाहनाने होत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून मौजा खापरी फाटा नागपूर उमरेड रोड वर नाकाबंदी करून यातील टिप्पर क्र. एम. एच.— ४० बि.जी.— ३९०९ चे चालकाने विनापरवाना अवैधरीत्या आपल्या ताब्यातील टिप्परमध्ये रेती भरून रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने टिप्पर क्र. एम. एच.— ४० बि.जी.— ३९०९ एकुण किंमती अंदाजे २०,००,०००/— रू. मध्ये एकुण ०७ ब्रास रेती किंमती अंदाजे २१,०००/—रूपयाचा मुद्देमाल असा एकुण २०,२१,०००/— रूपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने पोलीस स्टेशन कुही येथे टिप्पर चालक मालक **आरोपी नामे— स्वप्नील देविदास मोहीनकर, वय २४ वर्ष, रा. उमरेड ता. उमरेड जि. नागपूर** यांचे विरूद्ध कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

सदरची कारवाई मा. श्री. विशाल आनंद पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्री. डॉ. संदिप पखाले अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात परि. सहायक पोलीस अधीक्षक तथा ठाणेदार पोलीस स्टेशन कुही अनिल म्हस्के, सहायक पोलीस निरीक्षक नितेश डोर्लीकर, सहायक फौजदार प्रमोद बन्सोड, क्रिष्णा घुटके, पोलीस शिपाई विकेश राउत, रविंद्र मारबते यांनी केली आहे.

### चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** — अंतर्गत मोरारजी कंपनीच्या ०३ युनिट स्पिनींगच्या समोरील भाग येथे दिनांक ०५/०७/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान मोरारजी कंपनीचा सिक्युरीटी गार्ड नामे— संकेत अनिलराव ठाकरे, वय १९ वर्ष रा. हिंगणा हा काही दिवसा पासुन बंद असलेली मोरारजी कंपनीच्या मागच्या भागात फिरत असतांना कंपनी मधील युनीट ०३ मधील स्पिनींगच्या समोरील भागात भंगार व वायर पडलेले होते ते त्या ठिकाणी दिसुन आले नाही. सदर भंगार अंदाजे ०१ क्विंटल किंमती अंदाजे ८०,०००/— रू. व वायर अंदाजे ३० फुट किंमती अंदाजे १२,०००/—रू असा एकुण ९२,०००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार पांडे हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**